**ठळक बातम्या**

- राज्यातल्या कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्याच्या प्रस्तावाला राज्यमंत्रिमंडळाची मंजुरी

- नांदेड ते मुंबई वंदे भारत ट्रेनचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदासाठी न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस

- सुझुकीच्या इलेक्ट्रीक वाहन प्रकल्पाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- गणरायाच्या आगमनाची सर्वत्र जय्यत तयारी

**<><><><><><>**

राज्यातल्या कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्याच्या प्रस्तावाला आज राज्यमंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मंत्रालयात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गातल्या लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे तसंच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबविण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. नागपूर - गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्गालाही राज्य सरकारनं आज मान्यता दिली. यासाठी वेगळं महामंडळ स्थापन केलं जाणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांमध्ये सुधारणा, बीड जिल्ह्यातल्या आष्टीमध्ये न्यायालय स्थापन करण्यासाठी खर्चाला मान्यता, बीड जिल्ह्यातल्या ३ बंधाऱ्यांचा विस्तार यासारखे निर्णयही आजच्या बैठकीत झाले.

**<><><><><><>**

नांदेड ते मुंबई वंदे भारत ट्रेनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दूरस्थ पद्धतीने हिरवा झेंडा दाखवला. वंदे भारत एक्स्प्रेसमुळे नांदेड राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आलं असून यामुळे मराठवाड्याच्या समृद्धीचं दार उघडलं गेल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

या गाडीचा लाभ मराठवाड्यातल्या प्रमुख जिल्ह्यांना होईल, असा विश्वास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला. तर नांदेड ते मुंबई विशेष रेल्वे सुरू करण्यासाठीही प्रयत्न करू असं खासदार अजित गोपछडे यांनी सांगितलं.

या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली असून गाडीचे डबे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहेत. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचं अंतर ९ ते साडे नऊ तासात पूर्ण होणार आहे. पर्यटनस्थळं आणि तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या भाविकांसाठी प्रवास अधिक सुलभ होणार आहे. तसंच नियमित प्रवास करणारे प्रवासी, व्यापारी, अधिकारी यांच्यासाठीही ही गाडी उपयोगी ठरणार आहे.

<><><><><><>

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं एक हजार १५० खाटांचं सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावं, तसंच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचं काम दर्जेदार करावं अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. महाविद्यालयाच्या आधीच सुरू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या कामांचा समावेश करून नवीन योजना तयार करावी, नवीन रुग्णालयात आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा यांचा समावेश असावा, अशा सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

<><><><><><>

मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदासाठी न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदानं केली आहे. सध्या ते मुंबई उच्च न्यायालयातच न्यायाधीश म्हणून काम करत आहेत. सध्याचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करायची शिफारसही न्यायवृंदाने काल केली. तसंच मुंबई उच्च न्यायालयाच्या सहा अतिरिक्त न्यायाधीशांना कायमस्वरूपी नियुक्त्या देण्याची शिफारसही न्यायवृंदाच्या कालच्या बैठकीत करण्यात आली.

**<><><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी खारघर इथं पर्यायी जागा देण्याबद्दल सरकारने विचार करावा, असं मुंबई उच्च न्यायालयानं आज सुचवलं. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, मुंबईच्या दैनंदिन जगण्यात अडथळा येणार नाही, यादृष्टीनं या पर्यायाचा विचार करावा, अशी न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या पीठानं सूचना केली. मतभेद हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असला, तरी आंदोलनं ठरवून दिलेल्या ठिकाणीच व्हावी, असंही न्यायालयानं नमूद केलं. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी २७ ऑगस्टचा मोर्चा पुढ ढकलावा, अशी विनंती भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली होती.

**<><><><><><>**

भारताच्या मेक इन इंडियाच्या प्रवासात आज एक नवा अध्याय जोडला जात असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. गुजरातमधल्या हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक वाहनं - ‘ई वितारा’चं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही वाहनं युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह शंभराहून अधिक देशांमध्ये निर्यात

होणार आहेत. भारत आणि जपान संबंधांना यामुळे नवा आयाम मिळेल असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

येत्या काळात सर्व क्षेत्रात देशाला प्रगती करायची आहे. आजच्या प्रयत्नामुळे २०४७ चं विकसित भारताचं ध्येय नवी उंची गाठेल, जपान या ध्येयाच्या प्राप्तीत भारताचा विश्वासार्ह मित्र असेल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेल्या प्रधानमंत्र्यांनी इथल्या सुझुकी मोटार प्रकल्पालाही भेट दिली. प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचाही प्रारंभ झाला. तोशिबा, सुझुकी आणि डेन्सो यांचा हा संयुक्त उपक्रम आहे.

**<><><><><><>**

१० दिवस चालणाऱ्या  गणेशोत्सवाला उद्यापा्सून सुरुवात होणार असून गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी होत आहे. महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे आणि त्याच्या तयारीला वेग आला आहे.

गणरायाच्या आगमनाच्या आदल्या दिवशी आज घरोघरी हरतालिका पूजन  झालं. उद्या सर्वत्र सार्वजनिक आणि घरगुती गणेशमूर्तींची वाजतगाजत स्थापना होईल. मुंबईत दरवर्षी दहा हजारापेक्षा जास्त सार्वजनिक आणि दोन लाखांपेक्षा जास्त घरगुती गणपतींची स्थापना केली जाते. यंदाही लालबागचा राजा, सिद्धिविनायक अशा सार्वजनिक गणपतींसह घरगुती गणपतींच्या स्वागतासाठी मुंबापुरी सज्ज होत आहे. गणपतीचं मखर, आरास, सजावटीचं सामान, फुलं इत्यादी खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये लगबग आहे. हा सण अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्यासाठी महानगरपालिकेनं दरवर्षीप्रमाणे यंदाही आत्तापर्यंत जवळपास एक हजार टन शाडू माती मूर्तिकारांना मोफत पुरवली आहे. हा सण सुरक्षितरीत्या

साजरा व्हावा, यासाठी सार्वजनिक आरोग्य, रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण विभाग सज्ज आहेत. गणरायाच्या आगमनाप्रमाणेच विसर्जनही निसर्गस्नेही करण्यासाठी ६८ नैसर्गिक विसर्जनस्थळांसोबतच महानगरपालिकेनं जवळपास ३०० कृत्रिम तलाव तयार केले असून विसर्जनस्थळी निर्माल्य कलशही उपलब्ध करून दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी १९१६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे.

गणपती उत्सवाचा उत्साह नेहमीप्रमाणे कोकणात जास्त दिसून येत आहे. गावोगावी पसरलेले चाकरमानी गणपतीसाठी कोकणातल्या गावी पोहोचत आहेत. ऐकूया सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं चित्र  आमच्या वार्ताहराच्या शब्दात…

**होल्ड- व्हॉईस कास्ट**

*२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवासाठी सिंधुदुर्गवासीय सज्ज झाले आहेत.  सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७२ हजार ७५५ घरगुती गणपती आणि ३२  सार्वजनिक गणपती विराजमान होणार आहेत. गणेश चतुर्थी उत्सवाची सर्वांनाच आतुरता लागलेली असताना गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र उत्साहाचं वातावरण असून सिंधुदुर्गातल्या बाजारपेठा गजबजून गेल्या आहेत. गणेश मूर्ती शाळातून आधीच दोन दिवस मूर्ती घेऊन जायला सुरुवात झाली आहे. हा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणेन कंबर कसली असून जिल्ह्यातल्या सर्व रेल्वे आणि बस स्थानक, महामार्ग, घाटमार्ग आणि चेक पोस्टवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर गणेशोत्सव काळात अवजड वाहनांवर वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे.  गणेशोत्सवासाठी येणाऱ्या कोकणवासीयांची आरोग्य तपासणी करण्यासाठी रेल्वे आणि बस स्थानकावर वैद्यकीय पथक तैनात करण्यात आली आहेत. गणेशभक्तांच्या स्वागतासाठी जिल्ह्यातली सर्व प्रमुख रेल्वे स्थानक सजली आहेत. कुडाळ रेल्वे स्थानकावर विद्युत रोषणाई, बचत गटांचा स्टॉल, सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे. एकंदरीतच लाडक्या बाप्पाचं स्वागत करण्यासाठी सिंधुदुर्गवासीय सज्ज झाले आहेत.*

**रत्नागिरी** जिल्ह्यात यंदा एक लाख ६९ हजारांहून अधिक खासगी आणि १२६ सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. गेल्या आठवड्यातल्या अतिवृष्टीमुळे फटका बसला असला, तरी अर्थकारणाला चालना देणाऱ्या या उत्सवामुळे बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. महामार्गावरून येणाऱ्या भाविकांसाठी

सरकारने टोलमाफी जाहीर केली असून, जादा रेल्वेगाड्या, एसटी बस सोडण्यात आल्या आहेत. मुंबई, पालघर, ठाण्यातून जवळपास दोन हजार ९०० एसटी बस रत्नागिरीत पोचल्या आहेत. मुंबई-गोवा महामार्गाच्या डागडुजीचं काम सुरू असून, जिल्हा प्रशासनाने महामार्गावर १६ ठिकाणी सुविधा केंद्रं उभारली आहेत. पोलीस, परिवहन, महसूल आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी त्या केंद्रात असून, कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी ते सारे दक्ष आहेत.

गौरी गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर **पालघर** जिल्ह्यात फक्त पालघर तालुक्यातच गेल्या ४ दिवसात २० कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचं स्थानिक व्यापाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्याच्या विविध भागात येत्या दोन दिवसात जोरदार पावसाची शक्यता आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाट, सातारा घाट, नंदुरबार, धुळे, जळगाव, नांदेड, हिंगोली, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, आणि गडचिरोली या जिल्ह्यांना हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><><>//**